प्रकरण सहावे

अभ्यासाचे निष्कर्ष व शिफारशी

प्रकरण सहावे

अभ्यासाचे निष्कर्ष व शिफारशी

६.१ प्रस्तावना

६.२ महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ - एक आढावा

१) मंडळाचे उद्दिष्ट
२) खादी ग्रामोद्योग मंडळाच्या कक्षेतील उद्योग
३) महाराष्ट्रातील प्रशिक्षण केंद्र
४) मंडळाची वैशिष्ट्ये

६.३ प्रकरण-१ चे मूल्यमापन

६.४ प्रकरण-२ चे मूल्यमापन

६.५ प्रकरण-३ चे मूल्यमापन

६.६ प्रकरण-४ चे मूल्यमापन

६.७ प्रकरण-५ चे मूल्यमापन

६.८ अभ्यासाच्या मर्यादा

६.९ अभ्यासाचे निष्कर्ष

६.१० शिफारशी (सूचना)

प्रकरण सहावे

अभ्यासाचे निष्कर्ष व शिफारशी

६.१ प्रस्तावना :

या प्रकरणात सर्व प्रकरणांचा थोडक्यात आढावा घेतला असून " वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघ मर्यादित, इस्लामपूर " या संघाचा १९७२-ते १९९२ या २० वर्षांच्या काळातील प्रगतीचा ऊहापोह केला आहे. संघाचा अभ्यास करताना सहकारी चळवळीचा थोडक्यात परामर्श घेतला असून संघाचे कार्य कोणाच्या नियंत्रणाखाली चालते, संघाची स्थापना करण्यामागील उद्देश कोणता आहे हे स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे संघाची उद्दिष्टये कर्ज देण्याच्या अटी किंवा नियम, कर्ज वाटपाच्या मर्यादा, निधी, सभासदत्व, भागभांडवल, व्यवहार, व्यवस्थापन, कार्यकारी समिती, प्रवर्तक मंडळे, नोकर वर्ग, कर्ज वाटपाच्या उद्योगाप्रमाणे मर्यादा, मध्यवर्ती बँकेचे धोरण, नाबार्ड आकृतीबंध इत्यादींचा उल्लेख केला आहे. याशिवाय संघाच्या प्रगतीचा अभ्यास करताना संघाने चर्मोद्योग, कुंभार उद्योग, सुतार-लोहार उद्योग, वास उद्योग, वेत व बांबू उद्योग, लोकर उद्योग, ग्रामीण तेल घाणी उद्योग व धान्य डाळी प्रक्रिया उद्योग या आठ उद्योगांना केलेले कर्ज वाटप, उद्योगाप्रमाणे कर्ज वसुली, येणे बाकी, थकबाकी, यांचा आढावा घेतला आहे. याशिवाय अभ्यासाच्या काळात संघास मिळालेले अनुदान व इतर योजनांच्या साहाय्याने मिळालेल्या अनुदानांचा आढावा घेतला आहे. तसेच या संघाचे कार्य ज्या नियंत्रणाखाली चालते त्या खादी ग्रामोद्योग मंडळाचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. हा अभ्यास करताना संशोधकास जाणवलेल्या अभ्यासाच्या ज्या मर्यादा आहेत त्यांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. त्याच बरोबर या अभ्यासाचे निष्कर्ष या प्रकरणाच्या शेवटी स्पष्ट केले असून संघाच्या विकासासाठी व बारा बलुतेदारांच्या सोयीसाठी संघाची कर्ज वाटपाची व कर्ज वसुलीची पध्दत कशी असावी यासंबंधी सूचना केल्या आहेत.

६.२ महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ - एक आढावा -

वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघ मर्यादित, इस्लामपूर हा अभ्यासाचा विषय महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचा एक अंगभूत असा भाग आहे. या मंडळाकडून सभासदांना भाग भांडवल कर्ज, सबसिडी अशी सर्व प्रकारची मदत संघामार्फत केली जाते. त्यामुळे महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचा अगदी थोडक्यात आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. म्हणून असा माहितीवजा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. या आढाव्यातून मंडळाचा आणि संघाचा अन्योन्य संबंध स्पष्ट होईल.

१) मंडळाचे उद्दिष्ट -

महाराष्ट्रात १९६२ मध्ये खादी ग्रामोद्योग मंडळाची स्थापना झाली असून त्याचे उद्दिष्ट ग्रामीण भागातील गरज लोकांना रोजगार खेडयापाडयातील कारागिर व बलुतेदार यांच्या उद्योगाचे स्थैर्य, स्वयंरोजगारीच्या क्षेत्राची व्यापक प्रमाणात वृध्दी, खादी ग्रामोद्योगासाठी पतपुरवठा, अनुदान उपदान इत्यादी प्रकारे आर्थिक सहाय्य, खादी ग्रामोद्योगांच्या विकासासाठी कच्चा माल पुरवठा, छोटी पण समुचित तंत्र, यंत्र साधनांची उपलब्धी, कारागिरांचे तांत्रिक कौशल्य वाढविण्यास उत्तेजन, तयार मालाच्या विक्रीस मदत, प्रशिक्षणाची व्यवस्था, खादी ग्रामोद्योगाच्या विकासास पोषक ठरेल असे शासकीय धोरण अंमलात आणण्यासाठी शासनाशी प्रभावी संपर्क, एकंदरीने खादी ग्रामोद्योगांद्वारा समाज प्रबोधन आणि ग्रामीण उद्योजक कारागिरांना कार्यक्षम, अर्थक्षम आणि सेवाश्रम बनविणे हे होते.

२) खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या क्षेत्रातील उद्योग -

पुढील उद्योगांना कर्ज वाटप केले जाते.

अ) खनिज संपत्तीवर आधारित उद्योग -

यामध्ये पुढील उद्योग समाविष्ट केले आहेत. १) ग्रामीण कुंभार उद्योग, २) चुना उद्योग, ३) दगड फोडणे, खडी करणे, कोरणे इत्यादी, ४) दगडापासून बनविलेल्या उपयुक्त वस्तू, ५) दगडी पाटया व पेन्सील तयार करणे, ६) प्लॅस्टर ऑफ पॅरिस तयार करणे, ७) भांडी साफ करण्याची पावडर करणे, ८) सरपणापासून कोळसा तयार करणे, ९) सोने, चांदी, शिंपले व कृत्रिम धातुपासून दागिने तयार करणे, १०) रांगोळी बनविणे, ११) लाखेच्या बांगडया बनविणे, १२) रंग, डिस्टेंपर बनविणे.

ब) वनस्पतीवर आधारित उद्योग -

१३) हात कागद उद्योग, १४) आगपेटी उद्योग, १५) वास उद्योग, १६) लाख उद्योग, १७) रेक्झीन उद्योग, १८) वेत व बांबू उद्योग, १९) कात उद्योग, २०) कागद उद्योग, २१) वळा तयार करणे, २२) वाळ्याचे पडदे व केरसुणी तयार करणे, २३) वन उत्पादन संकलन व प्रक्रिया करणे, २४) फोटो फ्रेमिंग.

क) शेतमालावर आधारित उद्योग -

२५) धान्य डाळी प्रक्रिया उद्योग, २६) ग्रामीण तेल उद्योग, २७) गुळ व खांडसरी उद्योग, २८) नीरा ताडगुळ उद्योग, २९) औषधी वनस्पती संकलन उद्योग, ३०) फळ प्रक्रिया उद्योग, ३१) तरटी चटया व हार तयार करणे, ३२) काजू प्रक्रिया, ३३) द्रोण व पत्रावळी तयार करणे, ३४) ताडापासून वस्तू बनविणे, ३५) मका रोगावरील प्रक्रिया.

ड) पॉलिमर आणि रसायनावर आधारित उद्योग -

३६) चर्मोद्योग, ३७) अखाद्य तेल व साबण उद्योग, ३८) रबराच्या वस्तू बनविणे, ३९) रेक्झीनपासून बनविलेल्या वस्तू इ. ४०) शिंगे व हाडे यांचेपासून हस्तीदंती वस्तू बनविणे, ४१) मेणबत्ती, कापूर, लाख तयार करणे, ४२) प्लॅस्टिक पार्सल्स तयार करणे, ४३) टिकल्या बनविणे, ४४) मेहंदी तयार करणे, ४५) सुगंधी तेले तयार करणे, ४६) शॅंपू तयार करणे, ४७) केश तेल निर्मिती करणे, ४८) धुण्याचा साबण व पावडर बनविणे.

इ) अभियांत्रिकी व अपारंपारिक उर्जेवर आधारित उद्योग -

४९) सुतार उद्योग, ५०) लोहार उद्योग, ५१) ॲल्युमिनिअम उद्योग, ५२) गोबर गॅस प्लॅन्ट योजना, ५३) क्लिप्स, स्टोव्ह पिन्स इत्यादी तयार करणे, ५४) शोभेचे बल्ब व बाटल्या तयार करणे, ५५) छत्रीची जोडणी करणे, ५६) सूर्य व वायु उर्जेची उपकरणे तयार करणे, ५७) हाताने पितळी

मांडी तयार करणे, ४८) हाताने तांब्याची मांडी तयार करणे, ५९) हाताने काशाची मांडी तयार करणे, ६०) पितळ, तांबे व काशाच्या वस्तू, ६१) रेडिओ तयार करणे, ६२) रेडिओ कम कॅसेट प्लेअर तयार करणे, ६३) कॅसेट, रेकॉर्डचे उत्पादन, ६४) स्टॅबिलायझारचे उत्पादन, ६५) इलेक्ट्रॉनिक्स घडयाळे उत्पादन करणे, ६६) लाकडी फर्निचर तयार करणे, ६७) कल्हई करणे, ६८) मोटर वाईंडिंग, ६९) तारेच्या जाळया बनविणे, ७०) लोखंडी ग्रील्स बनविणे, ७१) हातगाडे, बैलगाडी बनविणे, ७२) संगीत वाद्य तयार करणे.

ई) वस्त्रोद्योग -

७३) खादी उद्योग, ७४) पॉलीवस्त्र, ७५) लोकवस्त्र, ७६) होजिअरी ७७) शिवणकाम, ७८) नायलॉन किंवा सुती मासे जाळे तयार करणे, ७९) बाटिक वर्क, ८०) खेळणी व बाहुल्या बनविणे, ८१) सुताच्या व लोकरीच्या गुंडया तयार करणे, ८२) भरतकाम, ८३) वैद्यकीय पट्टया बनविणे, ८४) स्टोव्ह वाती बनविणे.

फ) सेवा उद्योग -

८५) धुलाई, ८६) केस कापणे, ८७) नक्षकाम, ८८) विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स वस्तू दुरुस्ती, ८९) डिझेल इंजिन व पंप दुरुस्ती, ९०) टायर दुरुस्ती, ९१) किटकनाशके फवारे व पंप दुरुस्ती, ९२) लाऊड स्पिकर भाडयाने देणे, ९३) बॅटरी चार्जिन्ग, ९४) फलक रंगविणे, ९५) मोटार सायकल, सायकल दुरुस्ती, ९६) गवंडी काम.

३) महाराष्ट्रातील प्रशिक्षण केंद्रे :

महाराष्ट्रातील खालील ठिकाणी गावासमोर दर्शविलेल्या उद्योगांची प्रशिक्षण केंद्रे आहेत :

१. नाशिक - अखाद्य तेल व साबण

२. मुंबई - आगपेटी उद्योग व वाख उद्योग

३. डहाणू - नीरा ताडगुळ व आगपेटी उद्योग

४. पुणे - हात कागद उद्योग, मधमाशा पालन

५. महाबळेश्वर - मधमाशा पालन

६. औरंगाबाद - वाख उद्योग

७. जालना - ग्रामीण तेल उद्योग

८. वर्धा - धान्य डाळी प्रक्रिया उद्योग

९. भद्रावती - कुंभार उद्योग

१०. मोहोळ - चुना उद्योग.

४) मंडळाची वैशिष्ट्ये :

महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाची ठळक वैशिष्ट्ये पुढील-प्रमाणे विशद करता येतील.

१. अर्थसाहाय्य भांडवली खर्च, खेळते भांडवल, भाग भांडवल, कर्ज, भांडवल संचय कर्ज, साठा कर्ज, विक्री व्यवस्था, अनुदान इत्यादी स्वरूपात दिले जाते.

२. व्याज उपदान म्हणून संस्थास मदत दिली जाते.

३. रेशीम उद्योगासाठी विशेष कार्यक्रम राबविला जातो - यामध्ये रेशीम कीटक संगोपन, प्रशिक्षण रु. २५०-०० विद्या वेतन देऊन केले जाते. याशिवाय विक्री व्यवस्था ही पाहिली जाते.

४. स्फात्मिक ग्रामीण विकास योजने अंतर्गतचा फायदा मिळवून देणे.

५. विशेष घटक योजना या शासनाच्या योजनातंर्गत सोयीचा लाभ मिळवून देणे.

६. राष्ट्रीयकृत बँकांची सवलत व्याज दर योजनेचा फायदा मिळवून देणे.

७. महिला व मागासवर्गीयांसाठी विशेष सवलत देणे.

८. विक्री करात सवलत देणे - मंडळ शासनाकडे त्या संदर्भात शिफारस करणे.

९. विक्री व्यवस्थेसाठी ग्रामीण भागात ग्रामोद्योग विक्री केंद्रे सुरू करणे - महाराष्ट्रात अशी २९० विक्री केंद्रे सुरू केली आहेत.

१०. ग्रामोद्योग वसाहत उभारणे - ग्रामीण भागातील कारागिरांना आवश्यक सोयी एकत्रित उपलब्ध व्हाव्यात या हेतूने १९९१ पासून ग्रामीण वसाहत उभारण्याचे ठरविले आहे.

अशाप्रकारे खादी ग्रामोद्योग मंडळाची ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत.

६.३ प्रकरण-१ चे मूल्यमापन :

या प्रकरणात सहकारी चळवळीचा स्वातंत्र्यपूर्व काळातील विकास स्पष्ट करताना सहकारी चळवळीच्या विकासाचे टप्पे स्पष्ट केले आहेत. त्याच-बरोबर स्वातंत्र्योत्तर काळातील म्हणजे १९४७ नंतरचा सहकारी चळवळीच्या विकासाचा आढावा स्पष्ट केला आहे. खादी व ग्रामोद्योग मंडळ ही एक सहकारी संस्था असून या संस्थेच्या स्थापनेनंतर म्हणजे १९५६ नंतर महाराष्ट्रात या संस्थेची स्थापना १९६२ मध्ये झाली. ग्रामीण भागातील बारा बलुतेदारांना रोजगाराची हमी देण्याच्या दृष्टिकोणातून या संस्थेची स्थापना झाली असून त्याच उद्देशाने सांगली जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या (वाळवा, शिराळा, तासगाव, मिरज, जत, कवठेमहांकाळ, आटपाडी, खानापूर) ठिकाणी कारागिर विकास संघाची स्थापना ३१ जुलै, १९७२ रोजी स्थापन झाल्याचे स्पष्ट केले आहे. वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघ हा अभ्यासाचा विषय असून १९७२ ते १९९२ या काळातील संघाचा अभ्यास केला आहे. त्याचप्रमाणे हा अभ्यास कोणत्या प्रकारे करता येईल, माहिती गोळा करण्याचे मार्ग स्पष्ट केले आहेत. थोडक्यात हे प्रकरण इतिहास, अभ्यासाची उद्दिष्टये व व्याप्ती यांचेशी निगडित आहे.

६.४ प्रकरण-२ चे मूल्यमापन :

या प्रकरणात संघाची स्थापना करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या लोकवस्ती बरोबरच महाराष्ट्र अधिनियम क्रमांक स्पष्ट केला आहे. त्याच बरोबर संघाचे पहिले प्रवर्तक मंडळ (१९७२ चे) हुद्दा, वय, गाव व व्यवसायानुसार स्पष्ट केले आहे. तसेच १९७२ च्या नोकर वर्गाची परिस्थिती, १९७२ मधील कर्जाची मर्यादा, उद्योगाप्रमाणे दर्शविणारा तक्ता (तक्ता क्रमांक २.१), मध्यवर्ती बँकेच्या कॅश क्रेडिट धोरणानुसारची १९८० ते १९८८ मधील कर्ज मर्यादा दर्शविणारा तक्ता (तक्ता क्र. २.२) आणि १९९२ चे प्रवर्तक मंडळ स्पष्ट केले आहे. प्रकरणाच्या शेवटी संघातून नाबार्ड आकृतीबंधानुसार १९८९ पासून कर्ज वाटप केले जात असल्यामुळे ३९ उद्योगांच्या कर्ज मर्यादा दर्शविणारा नाबार्ड आकृतीबंध स्पष्ट केला आहे. नाबार्ड आकृतीबंधाचे वैशिष्टय असे की, त्यामध्ये स्थिर व खेळत्या भांडवलाच्या उद्योगाप्रमाणे कर्ज मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. थोडक्यात हे प्रकरण ' संघाचा एक आढावा ' याचेशी निगडीत आहे.

६.५ प्रकरण-३ चे मूल्यमापन :

या प्रकरणात संघाची वेगवेगळी २४ उद्दिष्टये स्पष्ट केली असून संघातून ज्या वेगवेगळ्या मार्गांनी (भाग भांडवल मदत, प्रवेश शुल्क, शासकीय मदत, कर्जाऊ रकमा) निधी उभारला जातो ते मार्ग स्पष्ट केले आहेत. तसेच कर्ज देण्याच्या अटी किंवा नियम उद्योगाप्रमाणे स्पष्ट केले असून नाबार्ड आकृतीबंधातील ३९ उद्योगांची नावे स्पष्ट केली आहेत. त्याचप्रमाणे संघाचे सभासदत्व कोणास स्विकारता येते व केव्हा संपते, भाग भांडवल व त्याच्या हस्तांतराचे नियम, संघातून केल्या जाणाऱ्या व्यवहारात व्याजाचा दर, विक्री व्यवस्था इत्यादी संबंधीची माहिती स्पष्ट केली आहे. त्याचप्रमाणे व्यवस्थापनात सर्वसाधारण सभा व तिचे नियम, कार्यकारी समितीची निवड

कार्यकारी समितीची घटना आणि व्यवस्थापकांची कर्तव्ये स्पष्ट केली आहेत. थोडक्यात हे प्रकरण संघाची उद्दिष्टये व व्याप्ती यांच्या निगडीत आहे.

६.६ प्रकरण-४ चे मूल्यमापन :

या प्रकरणात १९७२ ते १९९२ या काळातील संघाच्या प्रगतीची वाटचाल स्पष्ट केली आहे. संघाने केलेली प्रगती म्हणजे चर्मोद्योग, कुंभार उद्योग, सुतार-लोहार उद्योग, वाख उद्योग, वेत व बांबू उद्योग, लोकर उद्योग, ग्रामीण तेल उद्योग व धान्य डाळी प्रक्रिया उद्योग यासारख्या ग्रामीण भागातील रोजगार निर्माण करणाऱ्या व दुर्बल घटकांना मदतीचा हातभार लावण्याचा प्रयत्न होय. संघाच्या प्रगतीचा अभ्यास करताना उद्योगाप्रमाणे कर्ज वाटप, कर्ज वसुली, येणे बाकी, थकबाकी या बाबींचा अभ्यास करताना प्रत्येक वर्षानुसार त्या त्या घटकांची एकूण बेरीज व सभासद संख्या स्पष्ट केली आहे. तसेच कर्ज कशासाठी दिले जाते व कर्ज वाटप कमी होण्याची कारणे ही स्पष्ट केली आहेत.

१) १९७२- ते १९९२ या काळातील कर्ज वाटप पाहिल्यास सर्व उद्योगांना एकूण कर्ज वाटप रू. ८३,३०,४५५ रुपये झाल्याचे दिसून येते तर त्याचा लाभ एकूण १०,७६० सभासदांना झाला आहे. कर्ज वाटपाची सरासरी पाहिल्यास ती रू. ४,१६,५२३ असून सभासद सरासरी ५३८ इतकी आहे. उद्योगाप्रमाणे कर्ज वाटप पाहिल्यास कुंभार उद्योग व चर्मोद्योगास जास्त कर्ज वाटप झाल्याचे दिसून येते. त्यानंतर वाख उद्योग तिसऱ्या क्रमांकावर असून सुतार-लोहार उद्योगाचा चौथा क्रमांक लागतो. वेत बांबू उद्योगास या उद्योगांच्या तुलनेने कर्ज वाटप कमी असणे तरी ते इतर उद्योगांच्या तुलनेने जास्त आहे. कर्ज वाटपातील सभासद संख्या उद्योगाप्रमाणे पाहिल्यास वाख उद्योग सर्वात प्रथम असून त्या पाठोपाठ चर्मोद्योग, कुंभार उद्योग, सुतार-लोहार उद्योग, वेत बांबू उद्योग व इतर उद्योगांचा क्रमांक लागतो. लोकर उद्योग ग्रामीण तेल उद्योग व धान्य डाळी प्रक्रिया उद्योग या उद्योगांना संघाकडून

अत्यंत कमी प्रमाणात कर्ज वाटप झाल्याचे दिसून येते त्याचे कारण हे व्यवसाय खाजगी क्षेत्रात मोठया प्रमाणावर केल्याचे दिसून येते.

२) १९७२ ते १९९२ या काळातील कर्ज वसुली पाहिल्यास एकूण कर्ज वसुली ही रु. २३,८५,०१५ झाली असून ती ३,१८६ सभासदांकडून झाली आहे. कर्ज वसुलीची सरासरी पाहिल्यास रु. १,१९,२५१ रुपये दिसून येते तर सरासरी सभासद संख्या १५९ इतकी आहे. उद्योगाप्रमाणे कर्ज वसुली पाहिल्यास चर्मोद्योगातून सर्वात जास्त कर्ज वसुली झाल्याचे दिसते. त्या पाठोपाठ कुंभार उद्योग, सुतार-लोहार उद्योग, वाख उद्योगाचे क्रमांक लागतात. वेत बांबू उद्योगाची कर्ज वसुली या उद्योगाच्या तुलनेने जास्त असली तरी ती इतर उद्योगांच्या तुलनेत जास्त आहे. कर्ज वसुलीतील सभासद संख्या पाहिल्यास चर्मोद्योग, कुंभार उद्योग, वाख उद्योग, सुतार-लोहार उद्योग, वेत बांबू उद्योग व इतर उद्योगांचा क्रमांक दिसून येतो.

३) १९७२ ते १९९२ या काळातील येणे बाकीची रचना पाहिल्यास एकूण येणे बाकी रु. ५७,६८,४४७ ही ७,७१९ सभासदांकडील आहे. सरासरी येणे बाकी रु. २,८८,४२२ तर सरासरी सभासद संख्या ३८६ इतकी आहे. उद्योगाप्रमाणे येणे बाकी पाहिल्यास क्रमानुसार कुंभार उद्योग, वाख उद्योग, चर्मोद्योग, सुतार-लोहार, वेत व बांबू उद्योग व इतर उद्योग असा क्रम दिसून येतो तर सभासद संख्येचा क्रम पाहिल्यास वाख उद्योगाची सभासद संख्या जास्त असून त्यानंतर चर्मोद्योग, कुंभार उद्योग, सुतार लोहार, वेत व बांबू उद्योग व इतर उद्योग यांचे क्रमांक दिसून येतात.

४) १९७२ ते १९९२ या काळातील थकबाकीचा विचार केल्यास एकूण थकबाकी रु. १९,१८,०२३ ही ३,०९३ सभासदांची आहे. थकबाकीची सरासरी पाहिल्यास ती रु. ९५,९०२ आहे तर सरासरी सभासद संख्या १५५ इतकी आहे. थकबाकीचा उद्योगाप्रमाणे विचार केल्यास क्रमानुसार वाख

उद्योग, कुंभार उद्योग, चर्मोद्योग, सुतार-लोहार उद्योग, वेत व बांबू उद्योग व इतर उद्योग असे क्रम दिसून येतात. सभासद संख्येचा विचार केल्यास वाख उद्योग, चर्मोद्योग, सुतार-लोहार उद्योग, कुंभार उद्योग, वेत व बांबू व इतर उद्योग असे क्रम दिसून येतात. वाख उद्योगाची थकबाकी सर्वात जास्त दिसून येण्याचे कारण म्हणजे या उद्योगातील कर्ज वाटप हे प्रामुख्याने मांग समाजातील कारागिरांना केले जाते. या समाजातील कारागिरांची कर्जफेड करण्याची प्रवृत्ती ही कमी प्रमाणात असल्याचे दिसून येते. या संदर्भात संघास जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सूचना केल्याचे दिसून येते.

सदरील प्रकरण-४ हे संघाच्या प्रगतीच्या वाटचालीशी निगडीत आहे.

६.७ <u>प्रकरण-५ चे मूल्यमापन</u> :

या प्रकरणात संघास मिळालेल्या अनुदानांचा व योजनांच्या अनुदानांचा विचार केला असून संघास १९७२ ते १९९२ या काळात एकूण अनुदान रु. १५,२०,९७५ असून अनुदानांची वर्षाप्रमाणे रचना पाहिल्यास १९८९-९० या वर्षातील अनुदान सर्वात जास्त असून ते रु. ५,१९,६७० आहे तर सर्वात कमी अनुदान १९७४-७५ या वर्षातील असून ते फक्त रु. ८८० आहे. संघास मिळालेल्या अनुदानात सर्व योजनांचा विचार केल्यास सर्वात जास्त अनुदान खादी ग्रामोद्योग मंडळ विशेष घटक योजना अंतर्गत असून ते रु. ५,६९,२२५ आहे तर सर्वात कमी अनुदान सेवा शुल्क या योजने अंतर्गत असून ते रु. २३,६४२ असल्याचे तक्ता क्रमांक ५.१ वरून दिसून येते. संघास इतर योजनांच्या साहाय्याने मिळालेले अनुदान रु. ६,८५,६५३ आहे तर अनुदानाची रक्कम त्यापेक्षा जास्त असल्याचे तक्ता क्र. ५.१ वरून दिसून येते. हे अनुदान रु. ८,३५,३२२ आहे. संघास मिळालेल्या अनुदानाची सरासरी पाहिल्यास ती रु. ७६,०४९ असल्याचे स्पष्ट केले आहे. संघातील कारागिरांची

थकबाकी पाहता ती कमी व्हावी. या दृष्टीने २-१०-१९८९ रोजी (महाराष्ट्र शासन व कृषी व ग्रामीण कर्जमाफी योजना १९८९ प्रमाणे) संघास रु. ३,७६,७३२ कर्जमाफी स्वरूपात अनुदान मिळाले. ही ३९७ सभासदांची कर्जमाफी असल्याचे तक्ता क्र. ५.४ वरून स्पष्ट होते. थोडक्यात हे प्रकरण ` अनुदाने व इतर योजना ` यांचेशी निगडीत आहे.

६.८ अभ्यासाच्या मर्यादा :

संघाचा अभ्यास करीत असताना आलेल्या मर्यादा व दोष किंवा उणीवा यांचा येथे एकत्रित उल्लेख केला आहे.

१) संघाचा अभ्यास १९७२ ते १९९२ या २० वर्षांच्या काळातील आहे. हा अभ्यास करीत असताना संशोधकाने फक्त कार्यालयातील कागद-पत्रांचा (Secondary Data) उपयोग केलेला आहे. त्यामुळे काही कमतरता जाणवतात.

२) संघातून कारागिरांना केलेले कर्ज वाटप, कर्ज वसुली, येणे बाकी व थकबाकी यांची प्रत्येकी प्रत्येक वर्षानुसार एकूण बेरीज व एकूण सभासद संख्या यांच्यात काही ठिकाणी फरक दिसून येतो. उदाहरणार्थ त्या त्या घटकाची एकूण बेरीज वर्षानुसार केल्यास १९७४-७५, १९७६-७७ इत्यादी वर्षांत फरक दिसून येतो. त्याप्रमाणे सभासद संख्या पाहिल्यास १९७३-७४, १९७४-७५ इत्यादी वर्षांत फरक दिसून येतो. याचे कारण म्हणजे संघातून जेंव्हा कारागिराकडील कर्ज वसुली होते त्याचवेळी त्या कारागिरास कर्ज वाटप केले जाते म्हणून दोन्ही घटकात फरक दिसून येतो.

३) संघाच्या विपणन व्यवस्थेचा (सेल डेपो) सविस्तर अभ्यास केलेला नाही कारण संघाने सेल डेपोची सुरुवात १९८९ पासून केलेली आहे. मात्र त्याची व्यवस्था अजूनही योग्य प्रकारे झालेली दिसत नाही. संघाकडून सेल डेपोस जे महत्व यावयास पाहिजे होते तेवढ्या प्रमाणावर महत्व दिले गेलेले

नाही. हा सेल डेपो विक्रीसाठी क्वचित चालू असल्याचे दिसून आले म्हणून सेल डेपोचा विस्ताराने अभ्यासात ऊहापोह केलेला नाही.

४) संघातील सभासदांसाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा अभाव दिसून येतो. संघाच्या २० वर्षांच्या अभ्यासाच्या काळात तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्यान किंवा सभासदांना प्रशिक्षण दिलेले आहे असे कोठेही जाणवले नाही हा संघाच्या विकासातील व कारागिरांच्या हितांच्या दृष्टीने महत्वपूर्ण दोष संघाचा अभ्यास करीत असताना दिसून आला.

५) संघाने सुरुवातीपासून आठ उद्योगांना कर्ज वाटप केलेलेअसले तरी त्यामध्ये धान्य डाळी प्रक्रिया उद्योगास फक्त एकाच वर्षी (१९७७-७८) एका सभासदास रु. ५०० कर्ज पुरवठा केला आहे. त्यामुळे या उद्योगाचा विकास स्पष्ट करता आलेला नाही.

६) धान्य डाळी प्रक्रिया उद्योगाप्रमाणेच ग्रामीण तेल उद्योग व लोकर उद्योग यांना कुंभार उद्योग, चर्मोद्योग, सुतार-लोहार उद्योग, वास उद्योग, वेत व बांबू उद्योग या उद्योगांच्या तुलनेने अत्यंत कमी प्रमाणात कर्ज वाटप केलेले आहे. त्यामुळे या उद्योगांचा देखील विकास स्पष्ट करता आलेला नाही.

७) धान्य डाळी उद्योग, लोकर उद्योग व ग्रामीण तेल उद्योग यांना कमी प्रमाणात कर्ज वाटप झालेले असल्यामुळे त्यांचा स्वतंत्रपणे विचार करता आला नाही. या अभ्यासात सोयीसाठी त्यांचा एकत्रित उल्लेख ' इतर उद्योग ' असा केला आहे.

८) १९८९ पासून संघाच्या नोकर वर्गात कपात केली आहे त्याचे कारण स्पष्ट केलेले नाही कारण या संदर्भात संघाच्या सचिवांबरोबर चर्चा केली असता उत्तर समाधानकारक मिळू शकले नाही.

९) संघास मिळालेली वेगवेगळ्या प्रकारची अनुदाने उद्योगाप्रमाणे स्पष्ट करता आली नाहीत कारण संघास मिळालेले अनुदान उद्योगाप्रमाणे मिळालेले नसून ते एकत्रित स्वरूपात मिळालेले आहे.

१०) संघास १९७२ ते १९९२ या काळात मिळालेली वेगवेगळ्या प्रकारची अनुदाने संघीत स्वरूपाची दिसून येतात त्याच बरोबर ही अनुदाने वेगवेगळ्या रकमेची दिसून येतात याचे कारण म्हणजे महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ व सरकारचे धोरण होय.

११) संघातून नाबार्ड आकृतीबंधातील ३९ उद्योगांना कर्ज वाटप केलेले नसून फक्त आठ उद्योगांनाच कर्ज वाटप केले आहे.

१२) संघाच्या विक्री केंद्रात विक्रेता म्हणून जी व्यक्ती नियुक्त केली जाते त्यास फक्त महिन्यास रु. ३०० पगार दिला जातो. त्यामुळे विक्रेता म्हणून कोणीही व्यक्ती या पगारावर मिळू शकत नाही. संघाच्या विकासात त्यामुळे अडथळा निर्माण होतो.

६.९ <u>अभ्यासाचे निष्कर्ष</u> :

१) संघाची स्थापना ३१ जुलै, १९७२ रोजी झाली व कर्ज वाटप प्रारंभ हा दिनांक २ जून, १९७३ रोजी झाला. अभ्यासाच्या काळातील संघाचे कर्ज वाटप पाहिल्यास ते प्रामुख्याने बारा बलुतेदारांना झाल्याचे दिसून येते.

२) संघातून आठ उद्योगांना कर्ज वाटप केल्याचे दिसून येते ते प्रामुख्याने कर्ज वाटपाच्या मर्यादांच्या वेगवेगळ्या आकृतीबंधानुसार झाल्याचे दिसून येते.

३) १९७२-७३ ते १९८५-८६ या काळातील कर्ज वाटपाचे आकडे पाहिल्यास ते काही वर्षांचा अपवाद वगळता वाढताना दिसून येतात ही गोष्ट वाखाणण्याजोगी आहे.

४) संघातून केलेले कर्ज वाटप पाहिल्यास प्रतिवर्षी रु. ४,१६,५२३ कर्ज वाटप केले आहे. बारा बलुतेदारांना वाटप झालेले कर्ज वाटप म्हणून या आकड्याकडे पाहिल्यास तो समाधानकारक आहे. आपल्या अभ्यासाच्यादृष्टीने तो स्तर (Weaker section of the society) महत्वाचा आहे.

५) अभ्यासाच्या काळात ज्या सभासदांना कर्ज वाटप केलेले आहे त्या सभासदांची सरासरी काढल्यास ती ५३८ इतकी येते याचा अर्थ प्रतिवर्षी ५३८ सभासदांना कर्ज वाटपाचा लाभ मिळालेला आहे ही बाब समाधानकारक वाटते.

६) अभ्यासाच्या काळात संघाने केलेले कर्ज वाटप पाहिल्यास कुंभार व चर्मोद्योगाची एकत्रित टक्केवारी ६५.१६ इतकी आहे. याचा अर्थ या दोन उद्योगांना झालेले कर्ज वाटप इतर सर्व उद्योगांच्या तुलनेने जास्त आहे. इतर उद्योगाची कर्ज वाटपाची टक्केवारी फक्त ०.४८ इतकी आहे. म्हणजे इतर उद्योग दुर्लक्षित झाला आहे.

७) संघास अभ्यासाच्या काळात सर्व योजनांच्या साहाय्याने रु. १५,२०,९७५ अनुदान मिळाले असून यामध्ये इतर योजनांच्या तुलनेने खादी ग्रामोद्योग मंडळ विशेष घटक योजना अंतर्गत अनुदान जास्त आहे. संघाच्या आर्थिक विकासाच्यादृष्टीने अनुदान समाधानकारक आहे.

८) संघास १९७२ ते १९९२ या काळात मिळालेल्या अनुदानाची रचना पाहिल्यास सरासरी अनुदान रु. ७६,०४९ इतके आहे. संघाच्या विकासाच्यादृष्टीने ते समाधानकारक वाटते.

९) १९८९ पासून संघाची कर्ज वाटप मर्यादा नाबार्ड आकृतीबंधानुसार वाढविलेली आहे व संघाने १९९१-९२ या वर्षापासून या आकृतीबंधानुसार पूर्वीच्या आठ उद्योगांना कर्ज वाटप करण्यास सुरुवात केल्याचे दिसून येते. तसेच १९८९ पासून चुना व रेक्झीन उद्योगास कर्ज वाटप केल्याचे दिसून येते.

१०) १९७३-७४ ते १९७६-७७ या काळातील कर्ज वसुली वाढताना दिसून येते हे संघाच्या प्रगतीचे लक्षण म्हणावे लागेल.

११) १९८९-९० या वर्षापासून संघाने कारागिरांनी तयार केलेल्या वस्तू विकणेसाठी विक्री केंद्र संघाच्या ठिकाणीच सुरू केले आहे. या केंद्रास संघाने १९९२ (३१-३-१९९२)पर्यन्त कारागिरांचा माल खरेदीसाठी रू. ९,१९,०९१ कर्ज पुरवठा केला आहे.

१२) संघाने सुरू केलेल्या विक्री केंद्रातून रू. १९,८२७ नफा झाला आहे. हा नफा फक्त तीन वर्षातील (१९८९ ते १९९२) आहे. ही गोष्ट संघाच्या विकासातील एक महत्वपूर्ण घटना आहे.

१९७२ ते १९९२ या काळातील संघाचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून आले की, संघाची विकासाची धोडदौड चालू आहे.

६.१० <u>शिफारशी</u> (सूचना)

१९७२ ते १९९२ या काळातील संघाचा अभ्यास करताना संशोधकास दिसून आलेल्या उणीवा कमी व्हाव्यात या दृष्टीने काही महत्वपूर्ण सूचना केल्या आहेत.

१) संघाची कर्ज वाटपाची पध्दत अप्रत्यक्ष स्वरूपाची आहे म्हणजे कारागिरांना जे कर्ज दिले जाते ते नकाशात दर्शविलेल्या बँकामार्फत दिले जाते त्यासाठी कारागिरांना बँकात खाते उघडावे लागते व त्यानंतर कारागिरांना कर्ज मिळते. कर्ज वाटप संघातून झाल्यास कारागिरांच्या विकासाच्या दृष्टीने हिताचे ठरेल.

२) संघाची कर्ज वसुली ही कर्ज वाटपाप्रमाणेच अप्रत्यक्ष स्वरूपाची आहे. कर्ज वसुली प्रत्यक्ष स्वरूपात झाल्यास थकबाकीचे प्रमाण कमी होईल.

३) संघास स्वत:ची इमारत नसल्यामुळे कार्यात अडथळा निर्माण होतो. संघाने स्वत:ची इमारत बांधण्यासाठी इमारत निधी कारागिरांकडून उभारावा. हा निधी प्रत्येक सभासदांकडून कमीतकमी दोन रुपये उभारावा किंवा कर्जाची मर्यादा जास्त असलेल्या उद्योगातील कारागिरांकडून पाच रुपये इमारत निधी घ्यावा.

४) संघाच्या विकासाकरिता खादी ग्रामोद्योग मंडळाकडून संघास वेगवेगळ्या प्रकारची अनुदाने मिळतात. या अनुदानाप्रमाणेच खादी ग्रामोद्योग मंडळाने इमारत उभारण्यासाठी अनुदान द्यावे म्हणजे संघास स्वत:ची इमारत बांधण्यास मदत होईल.

५) संघाचा नोकर वर्ग अपुरा आहे. त्यामध्ये वाढ व्हावी. १९८९ पासून संघाकडे शिपाई नसल्याने संघाचे सर्व कार्य सचिव व सहाय्यक सचिवास करावे लागते. तेव्हा संघास एक शिपाई त्याच बरोबर एक कारकून मिळणे गरजेचे आहे.

६) संघातील कर्ज वाटपाच्या कार्यक्षेत्राचा विचार करता नोकर वर्ग अपुरा वाटतो. कारण कारागिरांच्या कर्ज वापरासंबंधी, कर्ज वसुलीसाठी संघातील सचिवांना फिरावे लागते. त्यामुळे कारागिरांना संघात गेल्यानंतर मार्गदर्शन होत नाही. तेव्हा सदर कार्यासाठी स्वतंत्र व्यक्तीची नेमणुक होणे गरजेचे आहे.

७) संघातून जे कर्ज वाटप होते ते आठ उद्योगांना नाबार्ड आकृती बंधानुसार झाले असले तरी इतर राहिलेल्या उद्योगांना कर्ज वाटप होणे आवश्यक आहे. बारा बलुतेदारांपैकी कारागिरांचा विचार केल्यास संघातून नाव्ही (नाभिक) समाज, वडर समाज (माती वडर व पाथरुड), तांबट समाज मुई समाज या समाजातील कारागिरांना कर्ज वाटप झालेले नाही. या

समाजातील उद्योगांचा समावेश नाबार्ड आकृतीबंधामध्ये दिसून येतो. त्यानुसार कर्ज वाटप होणे आवश्यक आहे. याशिवाय कोळी, परीट, शिंपी, सुतार इ. समाजातील कारागिरांना कर्ज वाटप होणे आवश्यक व गरजेचे आहे.

८) संघातील नोकर वर्गाचा पगार (वेतन) जरी कमी नसला तरी त्यांची गुणवत्ता व कार्यक्षमता वाढण्यासाठी वेतनात वाढ व्हावी.

९) संघाच्या विपणन व्यवस्थेसाठी जे विक्री केंद्र १९८९ सुरू केले आहे ते अनेकवेळा कामगारा अभावी बंद असताना दिसून येते. त्यासाठी स्वतंत्र व्यक्तीची नेमणूक खादी ग्रामोद्योग मंडळाकडून करावी.

१०) संघाने कारागिरांच्या वस्तूंच्या विक्रीची हमी घेतली पाहिजे. विक्री वाढविण्यासाठी विक्री किंमतीत सवलत द्यावी, वस्तूंचे नमुने पुरवावेत. वास्तविक पाहता कारागिरांच्या वस्तूंच्या विक्रीची हमी घेणे हे संघाचे उद्दिष्ट आहे मात्र त्यानुसार विक्री होत नाही म्हणजे विपणन व्यवस्था अपुरी आहे. विपणन व्यवस्था संघाच्या विकासाच्या दृष्टीने सुधारणे आवश्यक आहे. विक्री व्यवस्था सुधारणेसाठी विक्री करावी रक्कम खादी ग्रामोद्योग मंडळाने मरावी.

११) संघाच्या कर्ज वाटपाची मर्यादा वेगवेगळ्या उद्योगधंद्याच्या दृष्टीने ती वेगवेगळी असली तरी अलीकडच्या काळातील वाढत्या किंमत पातळीचा विचार करता ती अपुरी वाटते. कर्मोद्योगाची कर्ज मर्यादा रु. ४०,००० पर्यन्त तर कुंभार उद्योगांची कर्ज मर्यादा रु. ५०,००० पर्यन्त वाढवावी. तसेच इतर राहिलेल्या उद्योगांची कर्ज मर्यादा ही पाचे ते दहा हजार रुपयांनी वाढवावी.

१२) चर्मोद्योग व कुंभार उद्योगांची पुनर्रचना होणे गरजेचे आहे. म्हणजे चर्मोद्योगातील चप्पल तयार करणे व कातडी कमविणे आणि कुंभार उद्योगातील पारंपारिक मातीची मांडी (मडकी) तयार करणे व विटा तयार करणे हे उद्योग वेगवेगळे (स्वतंत्र) व्हावेत.

१३) संघाने कारागिरांच्या उत्पादकतेत वाढ होण्यासाठी कार्यशाळा (Workshop) सुरू करावी. म्हणजे त्या त्या उद्योगातील कारागिरांना प्रशिक्षण दिले तर त्यांची उत्पादकता वाढेल. ज्याप्रमाणे संघाकडे लढा यावयास पाहिजे होते त्याप्रमाणे लढा दिलेले नाही खादी ग्रामोद्योग मंडळाने अल्प मुदतीचे प्रशिक्षण वर्ग संघात सुरू करावेत.

१४) संघातील कारागिर सभासदांचा विकास होण्यासाठी तज्ञांची मार्गदर्शन भूमिका अत्यंत महत्वाची आहे. त्या दृष्टिकोणातून तज्ञ व्यक्तींची मार्गदर्शनासाठी नेमणूक करावी. त्या त्या व्यवसायातील कारागिरांना मार्गदर्शनासाठी तज्ञ व्यक्तींची नेमणूक व्हावी.

१५) संघातील कारागिरांना वेगवेगळ्या उद्योगांची माहिती व्हावी या दृष्टीने वर्षातून दोन ते चार प्रदर्शने किंवा प्रात्यक्षिके दाखवावित. त्यामुळे कारागिरांची उद्योगा विषयीची आवड, वाढत जाईल त्याच बरोबर त्यांची उत्पादकता ही वाढेल.

१६) संघाच्या आर्थिक दृष्टिकोणातून विचार करता १९८९ ची कर्जमाफी योजना जाहीर झाली तो संघाच्या दृष्टीने जरी फायदेशीर असली तरी तो थकबाकीस आव्हान देणारी आहे.

संशोधकाने संघाच्या विकासाच्या दृष्टीने व कारागिरांच्या हितासाठी आणि व्यावहारिक दृष्टिकोण समोर ठेवून काही परंतु महत्वाच्या सूचना केल्या आहेत. वरील बाबींचा संबंधितांकडून विचार झाल्यास या संघाच्या अभ्यासाचा उपयोग झाल्याचे आम्हास समाधान मिळेल.